## <u>कोळसेवाडी</u> वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३७ /२०२४ दि. १७/११/२०२४

### —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी,** कल्याण – डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतुक उप विभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणुक–२०२४ चे अनुषंगाने १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाची **मतदान साहित्य/मतपेटया वाटपाची प्रकिया दिनांक १९/११/२०२४ रोजी व मतदान साहित्य स्विकृती प्रक्रिया दिनांक २०/११/२०२४ रोजी** पार पडणार आहे. तसेच **दिनांक २३/११/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया सावित्रीबाई फुले कलामंदिर ( नाटयगृह ) डोंबिवली पुर्व** येथे पार पडणार आहे.

तसेच **१४३ डोंबिवली विधानसभा मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया दिनांक २३/११/२०२४ रोजी संत सावळाराम महाराज किडा संकुल, घरडा सर्कल जवळ, डोंबिवली पुर्व** येथे पार पडणार आहे. सदर दोन्ही परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** डोंबिवली स्टेशन, चार रस्ता, टिळकचौक, शेलारनाका मार्गे घरडा सर्कलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना डोंबिवली वाहतुक उपविभाग हद्दीत **शिवम हॉस्पीटल, डोंबिवली पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने शिवम हॉस्पीटल येथुन उजवीकडे वळुन जिमखाना रोड, सागर्ली मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** सुयोग रिजन्सी अनंतम, पेंढारकर कॉलेज मार्गे घरडा सर्कलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आर.आर. हॉस्पीटल, डोंबिवली पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने आर.आर. हॉस्पीटल येथुन डावीकडे वळुन कावेरी चौक, एम.आय.डी.सी. मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** खंबाळपाडा रोड, ९० फुट रस्ता, ठाकुर्ली रोड कडुन घरडा सर्कलकडे तसेच विको नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बंदीश पॅलेस हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | खंबाळपाडा रोड, ९० फुट रस्ता, ठाकुर्ली रोड कडुन येणारी वाहने खंबाळपाडा रोड–टाटा नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **४)** आजदेगाव व आजदे पाडा कमान येथुन घरडा सर्कल मार्गे बंदीश पॅलेस हॉटेलकडे जाणाऱ्या रोडवर सर्व प्रकारच्या वाहनांना **घरडा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने आजदेगाव व आजदे पाडा कमान येथुन बाहेर पडणारी वाहने डावीकडे वळुन शिवम हॉस्पीटल मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **५)** कल्याण शीळ रोडवरून विको नाक्या मार्गे बंदिश पॅलेस हॉटेल कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **विको नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | कल्याण शीळ रोड मार्गे जाणारी वाहने सरळ मानपाडा पो.स्टे. मार्गे टाटा नाका येथुन इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना **दिनांक १८/११/२०२४ रोजी ते दिनांक २०/११/२०२४ रोजी** पावेतो व **दिनांक २३/११/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. पासुन ते निवडणुक कार्यक्रम संपेपर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/–सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner


डोंबिवली कडे जाणारा रस्ता
शिवम् हॉस्पीटल
प्रवेश बंद
प्रवेश बंद
प्रवेश बंद
प्रवेश बंद
प्रवेश बंद
अप.आर हॉस्पीटल
कल्याण शिळ रोड
कल्याण शिळ रोड